# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE (ECHO GROUP)

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXIV — YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, AUGUST 2022 — No. 07


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

स्तोत्र : १०७ : ३१-४१

३१. परमेश्वराच्या दयेस्तव व त्याने मनुष्यांसाठी केलेल्या अद्भूत कृत्यांस्तव लोक त्याचे उपकारस्मरण करोत.

३२. लोकसभेत ते त्याची थोरवी गावोत, आणि वडिलांच्या बैठकीत त्यांचे स्तवन करोत.

३३. तो नद्यांचे अरण्य करितो, पाण्याच्या झऱ्यांच्या जागी शुष्क भूमि करितो.

३४. सुपीक देशाची त्यांत राहणाऱ्यांच्या दुष्टतेमुळे तो खारट भूमि करितो.

३५. तो अरण्याचें तळे करितो व शुष्क भूमीचे झरे करितो.

३६. तेथे तो भुकेल्यांस वसवितो, ते वस्तीकरिता नगर तयार करितात.

३७. ते शेते पेरितात व द्राक्षांचे मळे लावितात आणि त्यांस पीक मिळते.

३८. तो त्यांस आशीर्वाद देतो आणि त्यांची फार वाढ होणे; त्यांला गुरांची कमतरता पडू देत नाही.

३९. पुढे जुलूम, विपत्ति व दु:ख यांच्यामुळे ते कमी होतात व खालावतात.

४०. तो अधिपतींवर अपमानाचा मारा करितो; त्याला मार्गहीन वैराण प्रदेशात भटकावयास लावितो.

४१. पण दरिद्र्यांस क्लेशांतून मुक्त करून तो उच्च स्थानी ठेवितो; त्याची कुंटुंबे मेंढरांच्या कळपासारखी वाढवितो.

## देवाच्या खऱ्या लेकरांची ओळख
## THE IDENTITIES OF TRUE CHILDREN OF GOD!

पास्टर एस्. सॅम सेलवा राज

**''तो त्याला म्हणाला, मी परमेश्वर आहे; तुला या देशाचें वतन द्यावे म्हणून खास्ध्यांच्या ऊर गांवातून ज्याने तुला आणिले तो मीच परमेश्वर आहे''.**

**तो म्हणाला, ''प्रभु देवा, मला हे वतन मिळेल हे कशावरून''?**

**देवाने त्याला सांगितले, ''तीन वर्षांची एक कालवड, तीन वर्षांची एक शेळी, तीन वर्षांचा एक एडका, एक होला आणि पारव्यांचे एक पिल्लू अशी घे.''**

**त्याने ती सर्व घेतली व चिरुन त्याचे दोनदोन तुकडे केले आणि प्रत्येकाचे तुकडे समोरासमोर ठेविले, पक्षी मात्र त्याने चिरिले नाहीत.**

**त्या शवांवर हिंस्त्र पक्ष्यांनी झडप घातली, त्यांस अब्रामानें हाकून दिले.**

**सूर्यास्ताच्या सुमारास अब्रामास गाढ झोप लागली तो घोर भीतीने, निबिड अंधकारानें त्याला व्यापिले.**

**परमेश्वर अब्रामास म्हणाला, ''हे निश्चयें जाण की तुझे संतान स्वतांचा नव्हे अशा देशांत उपरी होऊन राहील व तेथेल्या लोकांचे दास्य करील आणि ते लोक चारशे वर्षे त्याला छळतील.**

**मग ज्या राष्ट्राचें दास्य ते करितील त्याचे मी पारिपत्य करीन; त्यानंतर ते बहुत धन घेऊन तेथून निघतील.'' (उत्पत्ति १५:७-१४)**

अब्राहामाने देवावर विश्वास ठेविला आणि ते त्याला नीतिमत्त्व असे मोजण्यात आले (गलती ३:६). देवाने अब्राहामाला त्याच्या संतानाविषयी दिलेले अभीवचन ४३० वर्षांनंतर पूर्ण झाले. ज्याने वचन दिले तो विश्वसनिय आहे आणि ते पूर्ण होणारच. त्यामुळे, जेव्हा आपण देवावर विश्वास ठेवितो ते आपल्यासाठी नीतिमत्त्व असे मोजण्यात येते.

### देव आमच्याकडून काय अपेक्षितो :

देव आम्हाला मोठ्याप्रमाणावर आशीर्वाद देवू इच्छितो, त्याकरीता तो आपल्याकडून विश्वास आणि आज्ञापालन अपेक्षितो. देवाबद्दल आपली समज वर्णनकरणे कठीण आहे. ''**अहाहा, देवाची संपत्ति, बुद्धि व ज्ञान ही किती अगाध आहेत! त्याचे संकल्प किती दुर्ज्ञेय आणि त्याचे मार्ग किती अनुपलक्ष्य आहेत! प्रभूचे मन कोणी ओळखले आणि त्याचा मंत्री कोण होता? त्याला प्रथम देऊन त्याची फेड मिळेल असा कोण आहे? त्याजपासून, त्याच्या द्वारे व तदर्थ सर्व आहे. त्याला युगानुयुग गौरव असो आमेन**'' (रोम ११:३३-१६)

एलिया संदेष्ट्याने एका भाकरीच्या तुकड्याची अपेक्षा केली; परंतु सारपथच्या

(...पान ३ वर)

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

"हा देव आमचा देव आहे; तो सर्वकाळ आमचा मार्गदर्शक होईल".
(स्तोत्र ४८:१४)



## आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


CHIEF EDITOR
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

ADMINISTRATION
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

EDITORIAL BOARD
Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.



EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

E.mail ID
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

YOUTUBE CHANNEL
Echo of His Call


प्रिय मित्रांनो,

तुम्हा सर्वांना जगाचा तारणारा, प्रभु येशू ख्रिस्त याच्या अद्भूत नामात शुभेच्छा देत आहोत.

आम्ही **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्यावर असलेल्या त्यांच्या प्रचंड आशीर्वादाबद्दल त्याचे आभार मानीत आहोत आणि त्याने तुम्हांस त्याच्या समृद्धीतून तृप्त करावे अशी प्रार्थना करीतो (स्तोत्र ३६:८)

आम्ही आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्यावर असलेल्या त्यांच्या निखालस कृपेमुळे आणि दयेमुळे सेवेच्या ५४व्या वर्षांत पदार्पण करित आहोत. मागील सर्व वर्षांमध्ये सेवेमधील त्याच्या विश्वासाबद्दल आणि प्रेमळ दयेबद्दल त्यांची स्तुती करीत आहोत आणि आभार मानीत आहोत. या अत्यंत महत्वाच्या प्रसंगी आम्ही आमच्या जगभरातील सर्व मित्रांची आणि भागीदारांची, ज्यांनी आमच्यावर प्रेम केले, प्रार्थना केल्या आणि आमच्या बऱ्या-वाईट अशा सर्व परिस्थितीत आमच्यासह उभे राहून आम्हाला आधार दिला त्यांची आठवण करून त्यांना दाद देत आहोत. आम्हाला याची खात्री आहे की, तुम्ही आमच्या सेवेबद्दल दर्शविलेल्या प्रेम आणि दयाळूपणाशिवाय आम्ही आजच्या सेवेमधील असलेल्या स्थानापर्यंत पोहोचू शकलो नसतो.

आम्ही अत्यंत आदराने आमच्या सेवाकार्याला फार मोठा आधार होता, त्या आता प्रभुसह गौरवण्यात असलेल्या आमच्या पूर्वीच्या सहकार्यांची आठवण करीत आहोत. ते म्हणजे बंधु जी. कमलारत्नम आय्.ए.एस्; बंधु वॉल्टर डॉवसन, बंधु एस्.सी. बुकले, बंधु जे.आर. सौंदरराज, बंधु जेयाकुमार महाराज, बंधु डी. डब्लू देवकांथम, बंधु आर.ई. जेयराज, बंधु जी. जेयनंदा पॉलमणी आणि मनुवेल एम्. पॉलराज.

आम्ही भारतात सर्वत्र, तसेच शेजारील देशांमध्ये अधीक मंडळ्या रोपणाद्वारे आमची सेवा वाढविण्याचे योजीत आहोत. आम्ही तुम्हा सर्वांना विनंती करीत आहोत, की या आमच्या सेवेच्या ५४व्या वर्षाच्या काळात ती पूर्ण करता यावी यासाठी प्रार्थना करा.

आम्ही मागील काही वर्षात कोविड १९च्या टाळेबंदीमुळे अपेक्षेप्रमाणे फारशी प्रगती करु शकलो नाही. आता पवित्र आत्म्याच्या वर्षावाद्वारे सैतानी बालेकिल्ले उध्वस्त करण्यासाठी, आग्रहि प्रार्थना करण्याची हिच योग्य वेळ आहे.

नेपाळ, बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका इत्यादी शेजारील देशांमध्ये शुभवर्तमान प्रसारासाठी उत्तम संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी तुमच्या प्रार्थनांची अपेक्षा करीत आहोत. सर्व प्रकारच्या अडखळणांमध्ये देखील आमची खात्री आहे की देव राजासनावर विराजमान असून सर्व काही यांच्या नियंत्रणात आहे.

प्रियांनो, जसा तुमचा आत्मा सुस्थितीत आहे तसे तुम्हाला सर्व गोष्टित सुस्थिति व आरोग्य असावे अशी आम्ही प्रार्थना करीत आहोत. (३ योहान २)

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**

(+91) 98412 71858 / 98410 71858, E.mail : samselvaraj333@gmail.com

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

(पान १ वरुन)

विधवेला दुष्काळ संपेपर्यंत संपूर्ण साडेतीन वर्षे भाकर मिळाली. (१ राजे १७:१६-१८). आपले उत्पन्न जरी थोडके असले, देव आपणाला अधिक आशीर्वाद देण्याकरिता त्यामधून एका भागाची अपेक्षा करितो. देवाच्या लेकरांना आशीर्वाद देण्याकरिता, त्यांनी ज्या मंडळीत ते सहिभागीता करीतात त्यामंडळीत त्यांनी कमीत-कमी एक दशमांश द्यावा अशी अपेक्षा करितो. **''सेनाधीश परमेश्वर म्हणतो, माझ्या मंदिरात अन्न असावे म्हणून सगळा दशमांश तुम्ही भांडारात आणा, म्हणजे मी आकाशकपाटें उघडून जागा पुरणार नाही एवढा आशीर्वाद तुम्हांकरिता वर्षितो की नाही याविषयी माझी प्रतीती पाहा.'' (मलाखी ३:१०)**

सर्व बाजूंनी दडपून गेलेले असल्यामुळे, तुमचे जीवन एखाद्या गंभीर युद्धभूमीप्रमाणे वाटत असेल; कदाचित तुम्ही सुटका होण्याची वाट पहात असाल. धैर्य धरा, देव तुमच्या बाजूनी आहे. तुम्ही तुमच्या व्यक्तित्वाशी गोंधळलेला असाल तर देव कार्य करणार नाही. तर मग आपण काय करावे?

### १) आपण आपले स्थान राखावे :

देवाची लेकरे म्हणून या जगात आपण असलो; तरी आपण या जगाचे नाही. आपले नागरिकत्व तर स्वर्गीय आहे (फिलिपै ३:२०) देवाने आपणाला ख्रिस्ताबरोबर जिवंत केले आणि त्याजसह उठविले आणि त्याच्यासह स्वर्गलोकी बसविले. (इफिस २:६) काहीवेळा ख्रिस्तामध्ये असलेल्या आपल्या उंच स्थानाचा आपल्याला विसर पडतो.

एक उदाहरण पाहू या. एका राजकर्त्याचे कार्यालय मुख्यालयात असते, जेथून तो कारभार चालवितो. तो नेहमीच कदाचीत मुख्यालयात नसणार कारण तो पुष्कळशा देशांत प्रवास करतो. तो दुसऱ्या देशाला भेट द्यावयास गेला तरी त्याचे नागरिकत्व आणि कार्यालयात बदल होत नाही. तो जो आहे तोच असतो आणि त्याच्याच देशाचा असतो. तद्वतच देवाची लेकरें या जगात कोणत्याही देशात असली तरी ते स्वर्गाचे असतात या जगाचे नसतात. आपण या जगात परके आणि प्रवासी असे आहोत आणि येथे काही समयापुरते राहण्याची आपल्याला परवानगी आहे. या भूतळावरील आमचे दिवस छायेप्रमाणे असतात. (१ इतिहास २९:१५). स्तोत्र कर्ता स्तोत्र ११९:१९ मध्ये ''मी या जगात केवळ प्रवासी आहे'' असे म्हणतो. ''माझ्या संसारयात्रेत तुझे नियम मला गीतरुप झाले आहेत (स्तोत्र ११९:५४) प्रेषित पेत्र म्हणतो. ''निवडलेले प्रवासी'' आहोत. (१ पेत्र १:१-२)

आपल्याला या जगात वरील सत्ये मनात बिंबवून जगण्याकरिता बोलाविले आहे आणि आपणास आपली संपत्ति स्वर्गात साठविण्यास सांगितले गेले आहे. (मत्तय ९:१९-२०) आपण या जगातील कोणत्याही देशात राहत असू; कोणतीही भाषा बोलत असू, परंतु आपण नेहमीच लक्षात ठेविले पाहीजे; आपण देवराज्याचे घटक आहोत. तरी ज्या देशात आपण राहातो तेथील संस्कृती आणि सवयी स्विकारल्या पाहीजेत. सर्व गोष्टीबद्दल देवाची स्तुती करीत भक्तिभावाने एकत्र राहू या. बायबल या बद्दल अशा रितीने स्पष्टीकरण देत आहे, **''आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या नामानें सर्व गोष्टींबद्दल सर्वदा देवपित्याचे उपकारस्मरण करा; ख्रिस्ताचे भय बाळगून एकमेकांच्या अधीन असा. बायकांनो, तुम्ही जशा प्रभूच्या अधीन तशा आपआपल्या नवऱ्याच्या अधीन असा, नवऱ्यांनो आपआपल्या बायकोवर प्रीति करा.''** (इफिस ५:२०-२२, २५, २८)

आपल्या जीवनातील प्रत्येक भागावर ''तो जसा पवित्र आहे.'' असे लिहिलेले असावे. (१ पेत्र १:१५). **''त्या दिवशी घोड्यांच्या घटांवर परमेश्वराला पवित्र अशी अक्षरे असतील...'' (जखऱ्या १४:२०). ''इस्राएल परमेश्वराला पवित्र, त्याच्या उपजाचें प्रथम फळ.'' (यिर्मया २:३) ''स्त्रीसंगाने मलिन न झालेले ते हेच आहेत, ते शुद्ध आहेत. जेथे कोठे कोकरा जातो तेथे त्याच्यामागे जाणारे ते हे आहेत, ते देवासाठी व कोकऱ्यासाठी प्रथम फळ असे मनुष्यांतून विकत घेतलेले आहेत.'' (प्रकटी १४:४).**

आमचे स्वर्गीय नागरिकत्व हे आपल्या सर्व वागणूकीतून परिवर्तीत झाले पाहीजे आणि ते सर्व प्रकारे राखले पाहीजे. काहीवेळा आपण कदाचीत प्रश्न करु की; इतरांप्रमाणे मी का चुका करु नये? इतरांप्रमाणे मी वागलो नाही तर या जगात मला कसे काय जगता येईल? अशा परिस्थितीत आपल्यात तो निग्रहीपणा असावा, की इतर वागतात तर मी तसे वागावे कां? माझे पाळक रेव्ह. सुंदराम बोलत असत, ''इतर कदाचीत करतील; परंतु मी करु नये आणि करणार नाही.''

तेव्हा सर्व परिस्थितीत, आपण एक अद्वितीय आणि वेगळे किंवा विभक्ततेचे जीवन जगावे. काही खिस्तीजन म्हणतात की, त्यांच्या आत्मिक जीवनाचा, त्यांच्या जगीक व्यवसायाशी आणि कामाशी काही संबंध नाही. त्यांच्या जीवनात सुख-समाधान, प्रेम आणि सत्य मिळते जे मंडळीत पहावयास मिळते ते त्यांना त्यांच्या कामाच्या ठीकाणी आणि व्यवसायात पाहावयास मिळू शकत नाही. काहीजण व्यवसाय करीत असताना देवासाठी कार्य करितात. ते त्यांच्या व्यवसायात क्वचितच सत्य आचारतात. जे कार्य करितात, ते इतरांप्रमाणेच त्यांचा व्यवसाय करीतात, त्यांच्यापैकी बहुतेक बेइमान-विश्वासघातकी असतात. ते इतरांना फसवितात, त्यांच्या व्यवसायातील युक्त्या आणि कौशल्य प्रभुच्या सेवेत आणि त्यांना अत्मिक अन्नभरविणाऱ्या पाळकांच्या बाबतीत देखील वापरतात. त्यांना सल्ला किंवा मार्गदर्शन केल्यास, ते म्हणतात ''सेवा आणि व्यवसाय दोन्ही वेगळे आहेत''. ही विचारधारा संपूर्णपणे चुकीची आहे. देवाच्या लोकरांनी त्यांची पवित्रता देवाच्या खऱ्या दासाप्रमाणे त्यांच्या सर्व मार्गात राखली पाहीजे. **''आमच्या सेवेला दोष लागू नये म्हणून आम्ही कोणत्याही प्रकारे अडखळल्याचे कारण होत नाही.''** (२ करिंथ ६:३)

### एक अनुभव :

एकदा मी स्वत:करिता एकॉर्डीयन खरेदीकरण्याकरिता, एका सुप्रसिद्ध देवाच्या सेवकाकडे गेलो जे वाद्य खरेदी-विक्रीचा व्यवसाय देखील करीत होते. एक विशिष्ट वाद्य माझ्या समोर ठेवून, त्यांनी मला सांगितले हे वाद्य जगातील एका प्रसिद्ध कंपनीने बनविलेले आहे. मी योग्य ती कीमत देऊन वाद्य खरेदी केले. दुर्देवाने एका आठवड्यातच मला सेवेकरिता पैशांची

गरज उद्भवली. मी तेच नवीन खरेदी केलेले ॲकॉर्डीयन घेऊन त्यांच्याकडे गेलो आणि मला अपेक्षित असलेली विक्रीची रक्कम व सर्व परिस्थिती सांगितली, त्यावर ताबडतोब ते मला म्हणाले, "हे कोण विकत घेणार? ही कंपनी आता अस्तित्वातच नाही. काही वर्षापूर्वी ही कंपनी बंद झाली आहे. हे खराब वाद्य आहे. विक्रीकरीता उपयुक्त नाही." आणि मला वाद्य परत घेऊन जाण्यास सांगितले. देवाच्या प्रिय लेकरांनो, आपण असे असू नये. आपल्या 'देवाचे लेकरु' या स्थानापासून आपण खाली घसरु नये. ख्रिस्तीजन जे विविध कौशल्याच्या कार्यात आहेत त्यांनी सर्व गोष्टित, सर्व प्रसंगी त्यांच्या स्थानाबद्दल सावध असले पाहीजे.

विश्वासणाऱ्यांनी जगीक लोकांमध्ये मिसळून, मद्यपानात, नाचगाण्यात, भेटी स्विकारण्यात, नशेचे पदार्थ विक्री करण्यात आणि अयोग्य प्रकारे व्यवसायात गुंतू नये.

### दुसरा अनुभव :

एकदा मी माझ्या एका मित्राला एका प्रसिद्ध डॉक्टरकडे घेऊन गेलो. आम्ही त्याच्या दालनात प्रवेश केला. दालनात पुष्कळशी वैद्यकीय उपकरणे ठेवण्यात आलेली. आम्हाला काही लोक गप्पा मारीत, हसत असलेले आढळले. तेथे बसलेल्यांपैकी एका व्यक्तिला, ती डॉक्टर आहे असे समजुन त्याला अभिवादन केले व मित्राची समस्या त्याला सांगितली, त्यावर त्यांनी दुसऱ्या व्यक्तिकडे बोट दाखविले. आम्ही व्यक्तकेलेला मान चुकीच्या व्यक्तिला दिला गेला. देवाने अतिशय कृपेने आपल्याला दिलेले स्थान आदरपूर्वक जपले पाहिजे. आपण ते कमी लेखू नये. "**यास्तव बंधूंनो तुम्हास झालेले पाचारण व तुमची निवडणूक ह्यासंबंधाने खातरी करून घेण्याबद्दल विशेषतः प्रयत्न करा, असे तुम्ही केल्यास तुमचे पतन कधीच होणार नाही. आणि तशा प्रकारे आपला प्रभु तारणारा येशू ख्रिस्त याच्या सार्वकालिक राज्यांत प्रशस्तपणे तुमचा प्रवेश होईल.**" (२ पेत्र १:१०-११).

देवाच्या लेकरांना त्याने आपल्याला दिलेल्या स्थानाच्या सर्व प्रसंगी मान राखावा. विश्वासणाऱ्यांनी आणि देवाच्या सेवकांनी देखील त्यांना सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची काळजी घ्यावी. देवाची लेकरे या जगात उच्च स्थानाप्रत नेण्यात आलेली अशी आहेत. ते जरी या जगात राहात असली, त्यांची अंतीम महत्त्वाकांक्षा हि देव राज्य आहे.

### २) तारणाची वस्त्रे

"**मी परमेश्वराच्या ठायी अत्यंत हर्ष पावतो, माझ्या देवाच्या ठायी माझा जीव उल्लासतो; कारण जसा नवरा शेलापागोटे लेऊन स्वतःला याजकासारखा मंडित करितो व नवरी जशी अलंकारांनी स्वतःला भूषित करिते, तशी त्याने मला तारणाची वस्त्रे नेसविली आहेत; मला धार्मिकतेच्या झग्यानें आच्छादिले आहे.**" (यशया ६१:१०)

पोशाखावरुन मनुष्याची ओळख बनते. दवाखान्यात डॉक्टर आणि वैद्यकीय चाचणी विभागातील कर्मचारी, परिचारीका या सर्वांना त्यांच्या कामानुसार पोशाख दिले जातात. त्याचप्रमाणे रखवालदार यांना देखील वेगळा पोशाख असतो. त्यांच्या पोशाखावरुन त्यांचे काम आपल्याला कळते.

तद्वतच, येशू ख्रिस्ताच्या रक्ताद्वारे धुतलेल्या लोकांना तारणाचे वस्त्र-पोशाख दिला जातो. "**असे की तुमच्यापूर्वीच्या आचरणासंबंधी जो जुना मनुष्य त्याचा तुम्ही त्याग करावा, तो कष्टाच्या वासनांनी युक्त असून त्याचा नाश होणार आहे. तर तुम्ही आपल्या मनोवृत्तीत नवे व्हावे, आणि धार्मिकता व सत्याची पवित्रता यांनी युक्त असा देवानुरुप उत्पन्न केलेला नवा मनुष्य धारण करावा.**" (इफिस ४:२२-२४)

काही लोकांना आपण ओळखत नसणार, परंतु ते जर तारण पावलेले असतील, तर त्यांच्या आकर्षक स्वभावामुळे आणि त्यांच्या ठायी असलेल्या तारणाच्या आनंदामुळे त्यांना ओळखू शकतो. केवळ आपल्या मंडळ्यामध्येच नाही, तर कामाच्या ठिकाणी, बाजाराच्या ठिकाणी आणि इतरत्र जर इतर लोक आपल्याला देवाची लेकरे म्हणून ओळखत असतील तर देवाचा आशीर्वाद आपल्या सोबत असणार.

हल्लीच्या दिवसात आत्मिक लोकदेखील इतर लोकांच्यामध्ये प्रभु, देव, तारण, प्रार्थना इत्यादी शब्दांचा वापर करण्यास तयार नसतात. काही लोकांना उपासनेला जात असताना पवित्र बायबल त्यांच्या हातात

(...पान ६ वर)


**नहेम्याह बाइबल कॉलेज**
**रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।**

ECHO OF HIS CALL 1969-2019 (ECHO GROUP)

**माध्यम: हिन्दी**

*सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार* - ATA

Regd. Candidate for Membership ATA NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI ★ ECHO OF HIS CALL ★ Estd. 1969

**सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 53 वर्षों से सेवारत वरिष्ठ पासवान**

सर्टिफिकेट इन थियोलॉजी – 1 साल
डिप्लोमा ऑफ थियोलॉजी – 2 साल

**योग्यता 10 वी या अधिक**
**जल्दी करें!**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
**10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.**
**Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858**
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
✶ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ✶

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

**प्रार्थना स्तुति आणि मुद्दे १९ ऑगस्ट २०२२ ते १८ सप्टेंबर २०२२ पर्यंत**

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✝ स्तुति करिता मुद्दे

**१९ ऑगस्ट** : आमच्या सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुलचा १० वी इयत्तेच्या विद्यार्थ्यांचा सरकारी परिक्षेत १००% उत्तीर्ण असा निकाल लागला.

**२० ऑगस्ट** : आमच्या **एको ऑफ हिज कॉल** मासिकांचे सहसंपादक व त्यांच्या कुटुंबियांबद्दल.

**२१ ऑगस्ट** : आमच्या मुख्य मंडळीतील आणि शाखा मंडळ्यांचे पाळक व सर्व वरिष्ठ सभासदांकरिता.

**२२ ऑगस्ट** : आमच्या कार्यक्षम कारागिरांसहित शुभवर्तमान साहित्य मुद्रणालयाच्या सतत सुरु असलेल्या कार्यक्षमते बद्दल.

**२३ ऑगस्ट** : आमच्या मुद्रणालयात एकूण १६ भाषांमध्ये शुभवर्तमान साहित्य छापून ते विविद मिशन क्षेत्रांमध्ये पाठविण्यात येत आहे.

**२४ ऑगस्ट** : कार्यक्षेत्रात देव आमच्या मिशनऱ्यांचे रक्षण करीत आहे.

**२५ ऑगस्ट** : मुख्य मंडळीत आणि शाखा मंडळ्यांमध्ये प्रत्येक रविवारच्या उपासनांमध्ये होत असलेल्या वचनाच्या सेवेबद्दल.

**२६ ऑगस्ट** : आमच्या मंडळ्यांमध्ये नवीन सभासदांची भर पडत आहे.

**२७ ऑगस्ट** : आमच्या सेवा कार्यास आधार देत असलेल्यांना वरील आशीर्वादाबद्दल.

**२८ ऑगस्ट** : देव आमच्या वरिष्ठ पाळकांची आणि त्यांच्या कुटुंबाची घेत असलेल्या काळजी बद्दल.

**२९ ऑगस्ट** : आमच्या सहसंपादकांबद्दल आणि त्यांच्या सहकाऱ्याबद्दल.

**३० ऑगस्ट** : नहेम्या बायबल कॉलेजकरीता विद्यार्थी मिळणे शक्य झाल्या बद्दल.

**३१ ऑगस्ट** : मागील महिन्यातील सर्व गरजा पुरविल्या बद्दल.

**०१ सप्टेंबर** : देवाच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि **पत्रव्यवहाराद्वारे** करण्यात येत असलेल्या अभ्यासक्रम या सर्वांवरील आशीर्वादा बद्दल.

**०२ सप्टेंबर** : मिशन क्षेत्रातील सेवकांच्या समर्पित सेवेबद्दल

**०३ सप्टेंबर** : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल**मधील नवीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबद्दल.

## ✝ प्रार्थने करीता मुद्दे

**०४ सप्टेंबर** : सेवाकार्यातील कार्यक्रमांसाठी आणि विस्तारा करिता.

**०५ सप्टेंबर** : सेवाकार्यातील आम्हांस सहकार्य करणाऱ्या सर्वांकरीता आणि सर्व राज्य समन्वयकांकरिता.

**०६ सप्टेंबर** : आमच्या सेवाकार्याच्या वाढीकरिता आणि जगभरातील सुवार्ताप्रसार कार्याकरिता.

**०७ सप्टेंबर** : भारतातील शुभवर्तमान न पोहचलेल्या सर्व भागात ते मागविणे शक्य व्हावे.

**०८ सप्टेंबर** : सर्व राष्ट्रांत शांतता आणि ऐक्य प्रस्थापित व्हावे.

**०९ सप्टेंबर** : आमच्या मुख्य मंडळीतील आणि शाखा मंडळ्यातील सर्व सभासदांच्या कल्याणाकरिता.

**१० सप्टेंबर** : जगभरातील स्त्रीयांच्या आणि लेकरांच्या सुरक्षिततेसाठी.

**११ सप्टेंबर** : आमचे वरिष्ठ पाळक, पास्टर एस्. सॅम सेलवा राज व त्यांच्या कुटुंबाचे सर्व दुष्ट शक्तिपासून रक्षण व्हावे.

**१२ सप्टेंबर** : कार्यालयातील वेळेत काम करणाऱ्या आमच्या सर्व स्टाफच्या आरोग्याकरिता आणि सुरक्षिततेकरिता.

**१३ सप्टेंबर** : देवाने **नहेम्या बायबल कॉलेज**साठी अधीक नवीन विद्यार्थी पुरवावेत.

**१४ सप्टेंबर** : सर्व मद्यपी आणि जादुटोणा करणाऱ्यांनी पश्चाताप करावा याकरिता.

**१५ सप्टेंबर** : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल**मध्ये २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरिता अधिक विद्यार्थी प्रवेश घेण्यास मिळावेत.

**१६ सप्टेंबर** : देवाने या महिन्यातील सर्व गरजा पुरवाव्यात.

**१७ सप्टेंबर** : देवाने जगभरातील सर्व ख्रिस्ती जनांना शांति आणि समाधान द्यावे.

**१८ सप्टेंबर** : आमच्या सर्व राज्य समन्वयकांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या स्वास्थ्य आणि आरोग्याकरिता.

(...पान ४ वरुन)

घेऊन जाणे कमीपणाचे वाटते. हल्लीच्या दिवसातील लोक ''बायबल'' सोबत नेणारे हात आणि प्रार्थनेत देवापुढे टेकणारे गुडघे जीवनात कदापी अयशस्वी होणार नाहीत'. या सत्याबद्दल अजाण आहेत.

मी एकदा माझ्या कुटुंबासमवेत हॉटेलमध्ये गेलो. जेवणास सुरुवात करण्याअगोदर देवाने दिलेल्या सुंदरशा दिवसाबद्दल आणि अन्नाबद्दल त्याची प्रार्थने द्वारे स्तुती केली. प्रार्थना संपविल्यानंतर आम्ही आमच्या जवळील टेबलावर बसलेले काही ख्रिस्ती आमच्याकडे पाहून तुच्छतेने हसत असलेले दिसले. त्यांचे आमच्याकडे पाहाणे आणि त्यांची कृति जणू दर्शवित होती :- ''आता देखील अशा प्रवृत्तिचे लोक आहेत.''

देवाची लेकरे या नात्याने आपण सर्व ठिकाणी आणि सर्व परिस्थितीत हे चांगले गुण रुजविण्यास शिकले पाहिजे. जे आपल्याकडे बघतील त्यांना स्वत:कडे पाहून आपण तारलेले आहोत हे दिसले पाहीजे. आपल्या संस्कृतिवरुन आणि सवयीवरुन त्यांनी आपल्याला प्रश्न केला पाहीजे; ''तुम्ही ख्रिस्त आहात कां? तुम्ही तारलेले आहात कां? इतपत आपली उपस्थिती आणि पोशाख जपला पाहीजे. आपला चेहरा आपले हृदय प्रतिबिंबीत करणारा असावा.

एकदा मी सेवाकार्यासाठी कॅनडा देशात गेलो असताना, मला एका प्रौढ व्यक्तिने त्याच्या मंडळीत सेवेकरीता बोलाविले. ते अतिशय दयाळू होते. मी त्यांच्यामध्ये देवाची प्रतिमा पाहू शकत होतो. संध्याकाळी त्यांनी मला एका ठिकाणी नेले आणि देवाच्या माणसाचा पोशाख कसा असावा आणि इतर चालीरीती कशा असाव्यात हे उपदेशक जे लोकांना त्यांनी मद्यपान करू नये, क्षुद्र सुख-समाधानात गुंतु नये असे धमकावून सांगतात त्यांनी स्वत: अशा पासून दूर रहावे अशी अपेक्षा असते. परंतु काही सेवक परदेशात जातात आणि त्यांना आवडते तसे जीवन जगतात. हे अतिशय दु:खदायक आहे.

वहाने रस्त्यावरून भरधाव धावतात. वहाने जरी भरधांव जात असतील आणि रस्त्यावर वहानांची मोठ्याप्रमाणात गर्दी असेल, वाहतुक नियंत्रण करणाऱ्या गणवेशातील पोलीसाने ''थांबा'' असा इशारा करताच वहाने थांबतात. येथे आपल्याला गणवेशातील पोलीसाने ''थांबा'' असा दिलेला इशारा आणि गणवेश परिधान न केलेल्या पोलीसाने दिलेल्या इशाऱ्यातील फरक कळतो किंवा जाणवतो. गणवेश त्याच्या अधीकाराला कायदेशीर स्वरुप देतो. आत्मिक जीवनात तारणाचा अनुभव आपल्याला अधिकार आणि दुष्टतेपासून, वाईटापासून संरक्षण देतो.

स्तोत्र १८:३५ आपल्याला असे सांगते. **''तूं मला आपली तारणरुप ढाल दिली आहे; आपल्या उजव्या हाताने मला उचलून धरिले आहे, तुझ्या लीनतेमुळे मला थोरवी प्राप्त झाली आहे.''** हे पहा, शांततेत राहावयाचे असल्यास, आपल्याला प्रभुची तारणरुप ढाल धरली पाहिजे. ती आपले सर्व वाईटापासून आणि दु:खद घटनांपासून रक्षण करण्याचे काम करील. अशाप्रकारे तारण आपले ढालीप्रमाणे संरक्षण करते.

ज्या वेळेस आपल्याला सैतान आणि या जगातील लोकांचा सामना करावा लागतो त्यावेळेस तारणाची वस्त्रे (ढाल) आपले रक्षण करतात. सेवेमध्ये असलेल्या माझ्या एका मित्राने मला एक सत्य गोष्ट सांगितली. एक मनुष्य दुष्ट आत्म्याच्या कचाट्यात सापडला आणि सांगता येत नाही अशा पुष्कळ दु:ख सहनात टाकला गेला. तो जेवू शकत नव्हता. त्याच्या बाजूने जाणाऱ्या लोकांवर तो हल्ला करीत असे. त्याच्या कुटुंबियांनी त्याला माझ्या मित्राकडे त्याने प्रार्थना करावी म्हणून आणले.

देवाच्या दासाने प्रार्थना करण्यास सुरुवात केली; तेव्हा त्या आजारी माणसामधील दुष्ट आत्मा बोलू लागला, ''हा माणूस येशू ख्रिस्त, जो जीवंत देव याची उपासना करीत होता. परंतु हल्ली गावात अशुद्ध आत्म्यांना बलीदान देण्यात सहभागी होऊ लागला आहे. त्यामुळे मी त्याच्यामध्ये वस्ती करण्यास आलेलो आहे. मी त्याला अधीक अपाय करु शकलो नाही कारण त्याच्या आई-वडिलांनी त्याचे नांव इम्यॅनुएल ठेविलेले आहे. त्याच्या या नांवामुळे मी त्याचा नाश करु शकलो नाही.'' पाहा, सैतान इम्यॅनुएल या नावापुढे देखील हतबल-निर्बल होतो.

तेव्हा, आपण ख्रिस्तीजन आपल्या लेकरांची नावे अतीशय विचारुपूर्वक द्यावीत काही आई-वडील लेकरांना नावे अशी देतात की त्यांचा उच्चार करणे देखील कठीण जाते. लेकरांना बायबलमधील


## नहेम्या बायबल सायं कॉलेज

### चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

ECHO OF HIS CALL (ECHO GROUP)

माध्यम : तमिळ

ATA Regd. Candidate for Membership NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI ECHO OF HIS CALL ★ Estd. 1969

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**

**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

नावे द्या आणि आनंद करा. तुम्ही त्यांना आत्मिक पुढाऱ्यांची आणि मिशनऱ्यांची नावे देवून विजयी जीवन जगण्यास सहाय्य करु शकता. अशा गोष्टींमुळे त्यांना दिर्घायुष्य आणि जीवनासाठी उत्तम उद्दिष्ट लाभू शकते. ''पाहा, मी चोरासारखा येतो. आपण नगन असे चालू नये व आपली लाज लोकांस दिसू नये म्हणून जो जागृत राहतो व आपली वस्त्रें राखितो तो धन्य.'' (प्रकटी १६:१५)

### ३) विभक्त जीवन विजयी आहे

**''तर मग तुम्ही प्रिय मुलांप्रमाणे देवाचें अनुकरण करणारे व्हा; आणि ख्रिस्तानें तुम्हांवर प्रीति केली, आणि देवाला सुवास मिळावा म्हणून स्वत:ला आपल्याकरिता अर्पण व यज्ञ असे दिले, तद्नुसार तुम्हीही प्रीतिने चाला. जार कर्म, सर्व प्रकारची अशुद्धता व लोभ, यांचा तुम्हांमध्ये उच्चारही न होवो, हे पवित्र जनांस शोभते. तसेच अमंगळपण, बाष्कळ गोष्टि व टवाळी यांचाही न होवो, ती उचित नाहीत; तर त्याऐवजी इशोपकारस्मरण होवो. जारकर्मी, अशुद्ध कृति करणारा किंवा लोभी (हा मूर्तिपूजक आहे) असल्या कोणासही ख्रिस्ताच्या व देवाच्या राज्यांत वारसा नाही हे तुम्ही जाणूनच आहा**''. (इफिस ५:१-५).

काही लोक या जगात अशा विचाराने रहातात कि, त्यांना आवडेल अशा प्रकारे बोलू आणि जगू शकतात परंतु देवाची इच्छा आहे की त्याच्या लोकांनी या जगाशी एकरुप होऊ नये. जग कदाचित म्हणेल, जगाबरोबर खांद्याला खांदा लावून - एकाच दिशेने चाला. परंतु देव इच्छितो कि आपण जगापासून वेगळे असे जीवन जगावे. काही ख्रिस्ती वेगळेपणाचे जीवन जगण्याच्या ढोंगी पणाखाली इतर ख्रिस्तीजनांबरोबर मिसळत देखील नाहित, असा दावा करून की ते इतर ख्रिस्ती जनांपेक्षा वेळे आहेत आणि त्यांना त्यांच्यापेक्षा वचनाची अधीक ओळख आहे. हे चुकीचे आहे, वचनात वेगळेपणाचे जीवन सांगण्यात आले आहे. ते वेगळ्या अर्थाने सर्व ख्रिस्तीजनांनी एकत्र येणे यात काही गैर नाही. हे आम्हाला योग्यप्रकारे वेगळे जीवन निष्ठावन्तपणे जगावे.

#### अ) देवाला अनुसरणे :

आजकाल अनेक ख्रिस्ती लोक राजकारणात सहभागी होत आहेत. त्यांनी राजकारणात देखील सत्य अवलंबिले; तर देवाचे नाव बिघडणार नाही. ते लोकांची सेवा करण्याचा एक मार्ग अशारितीने कदाचीत देवाचे नाव घेतील. परंतु ते त्यांचे जीवनातील प्रथम प्रेम नसावे. येशूला जीवनात प्रथमस्थान असावे. असे असताना देखील काही पाळक राजकारणात उडी घेतात आणि त्याचा वेळ आणि कौशल्य वाया घालवितात. त्यांनी जो पैसा त्यांच्या मंडळ्यासाठी आणि कुटुंबासाठी खर्च करावयाचा तो राजकारणात खर्च करु नये. ज्या पाळकांना देवाच्या सेवेकरिता पाचारण करण्यात आले आहे. त्यांनी राजकारणात लुडबुड करु नये.

#### ब) जगीक गोष्टिंमध्ये गुंतुन जाऊ नका :

''**माझ्या मुला, ख्रिस्त येशूच्या ठायी असलेली जी कृपा तिच्यांत बलवान होत जा. तूं ख्रिस्त येशूचा चांगला शिपाई आहेस म्हणून मजबरोबर दु:ख सोस. लढाई करणारा संसाराच्या कार्यात गुंतत नाही; ज्याने आपल्याला सैन्यात घेतले त्याला संतोषवावे हा त्याचा हेतु असतो. जर कोणी मलयुद्ध करितो; तर ते नियमाप्रमाणे केल्यावाचून त्याला मुगूट घालण्यात येत नाही.**'' (२ तीमथी २:१,३-५) ज्याला सेवेसाठी पाचारण करण्यात आले आहे, तो कदाचित त्याच्या कुटुंबाच्या आधाराच्या निगडीत कार्य करील. कसेही असो त्याने स्वत:स राजकारणात, संघटनेत, व्यापारात, क्लबमध्ये, इत्यादींमध्ये गुंतवू नये. येथील गुतणे ह्या शब्दाला अतिशय महत्त्व आहे. कारण, ''**कोणत्याही चाकराला दोन**

(...पान ९ वर)


## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. 'सर्टफिकेट इन मिनिस्ट्री' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in



## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्टला** भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |




# खड्ड्यातून महालापर्यंत

# PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## देवाच्या कार्याकरिता माझे पाचारण My call for God's Work




**एस्. सॅम सेल्वा राज (वय १८ वर्षे)**

पवित्र आत्म्याच्या प्रभावामुळे ऐन तारुण्यात वयाच्या १६-१८ वर्षाचे वय असताना माझ्या अंतर्यामात आणि विचारात बदल होऊ लागला आणि मला माझ्यातील कौशल्याला वळण लावण्यास दिशा मिळाली. त्यामुळे मी टाईपिंग, शॉर्ट हॅण्ड आणि इंग्रजी शिकलो. जे आजच्या माझ्या सेवेमध्ये अतिशय उपयोगी ठरले आहे. मला रेव्ह. एस्. देवदासन (हेरॉल्ड ऑफ हिज कमींग), पास्टर साधु येसुदास (किरुबासनम चर्च), पास्टर अब्राहाम (इंडियन पेन्टेकॉस्टल चर्च), पास्टर एन्. जीवानंदम (मागीझ्ची मॅगझीन) आणि सिस्टर सारा नवरोजी (चेन्नाई) यांच्या सारख्या देवाच्या खऱ्या दासांची देखील ओळख झाली. मला त्यांचे बारकाईने निरिक्षण करुन; त्यांच्याकडून, आत्मिक सत्यता, पवित्र जीवन जगण्याचे आकर्षण, परिश्रम करण्याविषयीचा निर्धार, संयम, प्रीति, संयम, नम्रता, अधीनता, आज्ञापालन, उपास, प्रार्थनाकरणे आणि देवाची सेवाकरणे हे सर्व शिकावयास मिळाले.



**सिस्टर सारा नवरोजी**



**पास्टर साधु येसुदास**

जस जसे मी त्यांच्या आत्मिक पावलांवर पाऊल टाकून त्यांना अनुसरत होतो मला प्रकर्षाने जाणवू लागले की, स्वर्गात आपल्याकरिता साठवून ठेविलेल्या आशीर्वादांचा या जगात देखील उपभोगू शकतो.

त्या वेळेस स्वर्गवासी रेव्ह. एस्. देवदासन (हेरॉल्ड ऑफ हिज कमिंग) यांनी मला पत्र लिहून, मी त्यांच्या सोबत देवाची देवा करण्यास यावे यासाठी आमंत्रीत केले. मी अगदि आनंदित झालो. कारण भविष्याकरिता ते चांगले होते. परंतु माझे आई-वडिल मात्र त्याबाबतीत काही बोलले नाहीत. त्यामुळे मी माझी साधी साक्ष देणे, प्रार्थना करणे, हस्तपत्रिका वाटणे सुरूच ठेविले. मी स्वत:स देवाच्या हाती सोपून दिले व त्याने मला या आवाहानात्मक स्थितीत मार्गदर्शन करावे म्हणून धीराने वाट पाहू लागलो.


कोठूनहि मार्ग मोकळा नव्हता, अशावेळी माझ्या काही मित्रांचे प्रेम मला लाभले. माझ्या आत्मिक जीवनात पिछेहाट झाली. माझ्यामध्ये जरी देवाचे भय होते, विश्वास होता. तरी मला काहितरी साध्य करण्याची महत्त्वाकांक्षा होती. त्यामुळे मी माझे मित्र जॉन, पेरुमल असारी, मानीकंदन यांच्या सोबत मिळून माझ्या घराचा एक भाग राजकारणाच्या वापराकरिता वेगळा केला आणि **सोंमबेरी मडम (आळशी मठ)** नावाची संस्था देखील सुरू केली. माझ्या आई-वडिलांना आणि नातेवाईकांना काय करावे हे सुचेना. परंतु माझ्या आईने आग्रहाने प्रार्थना करण्यास सुरुवात केली.

अशा स्थितीत एक दिवस सकाळच्या समयी पांढरे शुभ्र कपडे परिधान केलेले, एका हातात छत्री व दुसऱ्या हातात बायबल घेतलेले ६२ वयाचे रेव्ह. एस्. देवदासन माझ्या घरी आले. अशा सकाळच्या वेळी त्यांचे येणे अपेक्षित नव्हते. मी केवळ एकदाच त्यांना त्यांच्या कार्यालयात पाहिलेले होते. त्यांना पाहून, घाबरुन मी माझ्या आईच्या मागे लपलो. पाळक अतीशय प्रेमळ नजरेने माझ्याकडे आणि घराकडे पहात होते. सरते शेवटी त्यांनी आईकडे आणि माझ्याकडे पाहून म्हटले, ''देव या मुलाला त्याच्या सेवेसाठी बोलावित आहे. हा तुमचा मुलगा सॅम सेल्वा राज उद्या सकाळी ९ वाजता माझ्या कार्यालयात आला पाहिजे.'' त्यानंतर त्यांनी प्रार्थना केली आणि निघून गेले.



***Pr. S. Sam Selva Raj & Rev. S. Devadasan***

त्यावेळेपासून आमच्या कुटुंबात आनंदी वातावरण निर्माण झाले. एका मधुर सुगंधाने घर भरुन गेले. त्या दिवशी मी माझ्या सर्व मित्रांना आमंत्रण देऊन घरी बोलाविले व आईने तयार केलेल्या पदार्थांची मेजवानी दिली. मी त्यांना म्हटले मी **लेझी कॉन्व्हेंट (आळशी मठ)**





जीवनातील प्रत्येक हालचालींचे निरीक्षण करु लागलो आणि त्यांचा नम्र मदतनीस बनलो. त्यांचे अनुकरण करुन, मी गुडघे टेकून पुष्कळ वेळ पर्यंत प्रार्थना करु लागलो, पुष्कळ वेळ पर्यंत मोठ्याने बायबल वाचन आणि मनन करु लागलो आणि देव जे मजशी बोलत असे ते लिहून काढू लागलो.

प्रभु परमेश्वर भविष्यात माझ्या कशा प्रकारे उपयोग करुन घेणार आहे हे आगाऊ जाणून



सोडीत आहे आणि त्यांना शेवटचा निरोप दिला. हे ऐकून त्यांना धक्का बसला आणि उत्तर देण्यासाठी त्यांच्याकडे शब्द नसल्यामुळे ते सर्व निघून गेले.

दुसऱ्या दिवशी रेव्ह. एस्. देवदासन यांनी दिलेल्या आज्ञेनुसार मी त्यांच्या कार्यालयात गेलो. मी त्यांचा आत्मिक मुलगा आणि नम्र सेवक देखील झालो. मी त्यांच्या

रेव्ह. एस्. देवदासन यांनी अतिशय कडकपणे देवाच्या नीतिमत्तेत, पवित्रतेत आणि हरवलेल्या आत्म्यांबद्दल ओझे घेण्यास मार्गदर्शन केले. त्यांनी मला सत्यवचनी रहाण्यास, प्रार्थनामय जीवन जगण्यास आणि वाचन मनन करण्यास शिकविले. त्यांनी मला देवाची सेवा प्रामाणिकपणे कशी करावी, पवित्र जीवन काय आहे, पैसे नसताना देखील देवासाठी कसे काम करावे आणि देवाच्या वचनाला अनुसरुन त्याच्या सेवेसाठी निधी कसा उभारावा हे शिकविले. आणि त्यांच्या सरावाविषयीचे प्रशिक्षण देखील दिले.

***********

पान ७ वरुन

**धन्यांची चाकरी करिता येत नाही; कारण तो एकाचा द्वेष करील व दुसऱ्यावर प्रिती करील; अथवा एकाला धरुन राहील व दुसऱ्याला तुच्छ मानील. तुम्हांला देवाची आणि धनाची सेवा करीता येत नाही.''** (लूक १६:१३)

### क) प्रीतिने चाला :

''आणि ख्रिस्ताने तुम्हांवर प्रीति केली आणि देवाला सुवास मिळावा म्हणून स्वत:ला आपल्याकरिता अर्पण व यज्ञ असे दिले, तदनुसार तुम्हीही प्रीतीने चाला''. (इफिस ५:२) २ करिंथ १३, अध्याय परिपूर्ण प्रीति विषयी बोलतो. ''**प्रीति सहनशील आहे, उपकारशील आहे; प्रीति हेवा करीत नाही; प्रीति बढाई करीत नाही; चिडत नाही, अपकार स्मरत नाही. अनीतीत आनंद मानीत नाही, तर सत्य समागमात आनंद मानिते. सर्व काही सहन करिते, सर्व काही खरे मानण्यास सिद्ध असते, सर्वासंबंधाने धीर धरिते.''** (४:७).

### ड) नीतिमानाने सहभागी होऊ नये :

जारकर्म सर्व प्रकारची अशुद्धता, पैशांविषयीचा मोह याविषयी पवित्रजनांच्या विरोधात बोलले जाऊ नये आणि अशा गोष्टिंशी त्यांचे नाव जोडले जाऊ नये. त्याचप्रमाणे वायफळ गोष्टी; टवाळी इत्यादी टाळाव्यात ''**जारकर्म, सर्व प्रकारची अशुद्धता व लोभ, यांचा तुम्हांमध्ये उच्चारहि न होतो; हे पवित्र जनांस शोभते. तसेच अमंगळपण, बाष्कळ गोष्टी व टवाळी ह्यांचाही न होवो. ती उचित नाहीत; तर त्याऐवजी ईशोपकारस्मरण होवो.''** (इफिस ५:३-४)

### इ) ज्यांना येशू ख्रिस्तामध्ये सहभाग नाही:

व्यभिचार, अशुद्धता, पैशाविषयीचा मोह (मूर्तिपूजक) यांना देवराज्यात प्रवेश नाही. ''**अमंगळपण, बाष्कळ गोष्टी व टवाळी यांचाही न होवो. ती उचित नाहीत; तर त्याऐवजी ईशोपकारस्मरण होवो, जारकर्मी, अशुद्ध कृति करण्यारा किंवा लोभी (हा मूर्तिपूजक आहे) असल्या कोणाचाही ख्रिस्ताच्या व देवाच्या राज्यात वारसा नाही हे तुम्ही जाणूनच आहा.''** (इफिस ५:४-५) कवी थीरुवालुवर यांनी म्हटले आहे - ''स्वच्छ दाढी किंवा लांब केस जर बंद केले, ज्याचा जग तिटकारा करील.'' स्वच्छ दाढी किंवा लांब दाढीचा चुकीचा अर्थ समजु नका. मनाई केलेल्या किंवा बंदि घातलेल्या गोष्टींमध्ये न गुंतणे नेहमीच चांगले. ''हे लोक ओठांनी माझा सन्मान करितात, परंतु त्यांचे अंत:करण मजपासून दूर आहे. ते मनुष्यांचे नियम, शास्त्र म्हणून शिकवून माझी निरर्थक भक्ति करितात.'' (मत्तय १५:८-९)

### फ) जीवंत यज्ञ :

प्रेषित पौल आपल्याला विनवित आहे की आपण आपल्या शरीरांचा जीवंत, पवित्र व देवाला प्रिय असा यज्ञ करावा. ही आपली आध्यात्मिक सेवा आहे. ''**या युगाबरोबर समरुप हाऊ नका; तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रुपांतर होऊ द्या, यासाठी की देवाचीजी उत्तम, ग्रहणीय**

## निवडक

ख्रिस्ती धर्म भारतात २००० वर्षापासून आहे. तो भारतात पाश्चिमात्यांद्वारे आला नाही. तो पहिल्या शतकात संत थोमा द्वारे आला. ख्रिस्ती धर्म हा काही गोऱ्यांचा धर्म नाही.

''लक्षात घ्या, कि युरोपांमधील अनेक देश ख्रिस्ती झाले नव्हते. त्यावेळेस संत थोमा भारतात आले. त्यामुळे जे भारतिय ख्रिस्ती त्याच्याशी जोडतात त्यांचा इतिहास फार जुना आणि अनेक युरोपिय देशांपेक्षा पुरातन आहे आणि असे घडले ही खरोखरी आपल्यासाठी एक अभिमानाची अशी गोष्ट आहे.

**- डॉ. राजेंद्र प्रसाद १८ डिसेंबर १९५५ रोजी, भारताचे पहिले राष्ट्रपती.**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

**व परिपूर्ण इच्छा, ती काय आहे. हे समूजन घ्यावे.'' (रोम १२:२) तेव्हा आपण समरुप होणे थांबवून नवीकरणास सुरुवात करावी.**

हे पराकाष्टेचे अनुभव कठीण वाटतात. परंतु जे या अनुभवातून गेले आहेत. ते देवाची मंद वाणी ऐकू शकतात. देवाचा निवास मंडप मनुष्यांच्यामध्ये आहे. ते त्याचे लोक होतील. ''...**देव स्वत: त्याजबरोबर राहील**'' (प्रकटी २१:३). देव करो आणि या जगात देखील अनुभव आम्हांस देवो! आमेन.

***********

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th AUGUST 2022**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**